-: प्रेसनोट दिनांक - २९/०६/२०२६ :-

आरोपी लोकसेवक संजय बापू तेली, वय - ५२ वर्षे, पद - निमतानदार, उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय शिरोळ, जि.कोल्हापूर रा. आळते, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत.......

---

तक्रारदार यांचे आई वडील मयत झाले असुन त्यांचे नावावर असलेल्या मिळकतीवरती वारस व फेरफार नोंद करणेकरीता तक्रारदार यांनी उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय शिरोळ येथे अर्ज केला होता. सदरचे काम संजय बापू तेली, पद - निमतानदार यांचेकडे होते. सदर कामाचे अनुषंगाने तक्रारदार हे तेली यांना भेटले त्यावेळी तेली यांनी तक्रारदार यांच्याकडे वारस व फेरफार नोंद करणेकरीता २०००/- रूपये दयावे लागतील असे म्हणुन तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार दिली होती.

तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता, पडताळणीमध्ये तक्रारदार यांचे मिळकतीवर त्यांचे नावे वारस व फेरफार नोंद करणेकरीता तक्रारदार यांच्याकडे २०००/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले

त्यानंतर सापळा कारवाई आयोजीत केली असता, पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचेकडुन आरोपी संजय बापू तेली, वय - ५२ वर्षे, पद - निमतानदार, उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय शिरोळ, जि.कोल्हापूर रा. आळते, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर यांनी २०००/- रूपये लाच स्विकारलेने, त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदरबाबत आरोपी लोकसेवक संजय बापू तेली, वय - ५२ वर्षे, पद - निमतानदार, उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय शिरोळ, जि.कोल्हापूर रा. आळते, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर यांचेविरुध्द शिरोळ पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्री. अर्जुन भोसले, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार,वैष्णवी पाटील, पोलीस उपअधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राजेंद्र सानप, पोहेकॉ सुधीर पाटील, पो.कॉ. कृष्णा पाटील, संदिप पवार, रविंद्र पाटील ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री क्रमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी क्रमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३) श्रीमती वैष्णवी सुरेश पाटील,पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९७६४१४०७७७. ९४०४३२१०६४ कार्यालय दुरध्वनी क्रमांक - ०२३१/२५४०९८९.

४) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक:- १०६४.